कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२५-२६/१७४
दि. २१/०४/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ रोजी "वार्षिक दिन" सोहळा संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम कला अकादमीच्या मा. दीनानाथ मंगेशकर सभागृहात दुपारी ठिक ३.३० वाजता संपन्न होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात "ईश गजानन" या गायन, वादन व नृत्याच्या विशेष कार्यक्रमाने होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये कु. मुक्ता मिसर, कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. राज्ञी फळदेसाई, कु. सदानंद झो, श्री. शिशीर शंखवाळकर कु. कौस्तुभ च्यारी, कु. अथर्व गायक, कु. सुरज मळीक, कु. अमिषा अडकोणकर, कु. अनुश्री कोळी, कु. तृप्ती दळवी, कु. वेदा देसाई, कु. वरदा चव्हाण, कु. मुक्ता जोगळेकर, कु. सानवी धुपकर, कु. प्रेरणा प्रभु, कु. रिध्दीमा वेंगुर्लेकर, चैताली चोडणकर, कु. शिल्पा के, कु. मंजिरी फुटणकर व कु. निधी नाईक शिरोडकर हे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाला श्री. पांडुरंग गावस व श्री. सुरज मोरजकर यांची तबला साथ, तसेच श्री. रोहित वनकर यांची बासरी साथ व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ विद्यार्थ्यांना लाभणार आहे. तसेच नृत्याच्या कार्यक्रमासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथ, डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर यांची नटवंगम् साथ तसेच सौ. सम्राज्ञी आईर व डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायन साथ व विद्वान डि. आर. चेथनमुर्ती यांची मृदंगमची साथ संगत विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

या कार्यक्रमानंतर भारतीय संगीत व नृत्य विभाग तसेच कला अकादमीच्या संगीत केंद्रातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते प्रशस्त्रीपत्रके व पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे कला व संस्कृती व क्रिडा मंत्री आणि कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंद गावडे उपस्थित राहणार आहेत. तसेच आग्रा घराण्याचे प्रसिध्द गायक व गोवा संगीत महाविद्यालयाचे माजी प्राचार्य पं. कमलाकर नाईक हे खास आमंत्रीत म्हणून उपस्थित राहतील तर कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. अरविंद खुटकर यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसठी खुला असून सर्व संगीत रसिक व विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थिती लावावी व कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)